**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2**
**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# महाराष्ट्रातील जलव्यस्थापन प्रकल्प उभारणीमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे योगदान : ऐतिहासिक विश्लेषण

**आशिष हिरामण वाघ,** संशोधक विद्यार्थी, नंदुरबार तालुका विधायक समितीचे ग.तु.पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार ता.जि. नंदुरबार
**डॉ. विनोद गौतम सोमकुवर,** सहयोगी प्राध्यापक, संशोधक मार्गदर्शक, इतिहास विभागप्रमुख, ग.तु.पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार ता.जि. नंदुरबार

**सारांश:**

यशवंतराव चव्हाण हे एक बहुआयामी नेतृत्व होते, ज्यांनी केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळाली. जलव्यवस्थापन क्षेत्रात त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रातील कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडले. त्यांनी सुरू केलेल्या जलविकास प्रकल्पांमुळे जलव्यवस्थापनाच्या धोरणांमध्ये अधिक समर्पण आणि प्रभावीता आली. आजच्या काळात जलसंपत्तीचे योग्य संवर्धन आणि वापर अत्यंत महत्त्वाचा आहे, आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांशी तो सुसंगत आहे. त्यांच्या जलविकासाच्या दृष्टीकोनामुळे आजच्या जलसंकटाशी संबंधित उपाय शोधण्यात मदत होईल. यशवंतराव चव्हाण यांच्या जलविकासातील योगदान, त्यांच्या धोरणांचा प्रभाव, आणि कोयना, उजनी, आणि जायकवाडी यासारख्या प्रमुख जलप्रकल्पांचे शेतकरी, उद्योग आणि राज्याच्या विकासावर काय परिणाम झाले आहेत, याचे विश्लेषण या संशोन पेपरमध्ये करण्यात आले आहे.

**बीजसंज्ञा -** यशवंतराव चव्हाण, जलव्यवस्थापन प्रकल्प, धरणे, शेती.

## प्रस्तावना

पाणी हे जीवनाचा मूलभूत घटक आहे. प्रत्येक सभ्यता, संस्कृती आणि समाजाच्या विकासात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर पाणी व्यवस्थापनाने आपल्या जीवनशैलीला आकार दिला आहे. प्राचीन काळातही मानवाने पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न केलेले दिसून येतात. पाऊसाचे पाणी, नद्या, तलाव, कुंडे(ओढे), विहिरी किंवा जलवाहिन्या याद्वारे संचयित करण्याचे व्यवस्थापन झालेले आहे. या पाण्याच्या स्रोतांचा वापर करणे, त्याचे संरक्षण करणे आणि त्याची योग्य नियोजन व्यवस्था करणे हे मानवाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले. प्राचीन सभ्यतांच्या उत्थान आणि पतनामध्ये पाण्याच्या स्रोतांची स्थिती आणि त्याचे व्यवस्थापन याचा मोठा प्रभाव पडला आहे. भारतातील सिंधू सभ्यता, प्राचीन मिसर, मेसोपोटेमिया आणि इतर स्थळांवर पाणी व्यवस्थापनाची उत्कृष्ट उदाहरणे पहायला मिळतात. जलसंपदा आणि जलप्रदूषणाच्या समस्या इतिहासात जितक्या जास्त होत्या, तितकाच त्यांचा साक्षात्कार आणि उपाय शोधण्याचा मानवी प्रयत्न देखील होत गेला. सिंधू संकृतीमध्ये जलवाहिन्या आणि जलाशयांचा वापर केला जात होता. त्याचप्रमाणे, गंगा आणि


**Copyright © | JET Network, All Rights Reserved**

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

यमुना नद्यांच्या काठावर असलेल्या प्राचीन नगरांची उभारणी ही पाणी मिळवण्याच्या सोयीसाठीच होती.(1)

पाणी म्हणजे सत्ता आणि समृद्धी याचा इतिहासात गहन संबंध आहे. जेव्हा राजे किंवा साम्राज्ये पाणी व्यवस्थापनासाठी उपाययोजना करीत, तेव्हा त्यांना आपल्या साम्राज्याचा विस्तार व समृद्धी मिळविण्यासाठी ते महत्त्वपूर्ण ठरत असे. चंद्रगुप्त मौर्य किंवा अकबर यांसारख्या शासकांनी जलस्रोतांची पूर्तता सुनिश्चित केली होती. इतिहास आणि पाणी यांचा अतूट संबंध आहे. पाणी व्यवस्थापनाच्या संघर्षातूनच सभ्यता आणि संस्कृतींचे विकास आणि उत्थान घडले. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर, पाणी ही केवळ जीवनाची आवश्यकता नव्हे, तर समाजाच्या प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण दुवा बनला आहे. इतिहासातील प्रत्येक पिढीने पाणी वापरण्याच्या, संरक्षित करण्याच्या आणि त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या कलेत नवीन विचार, तंत्रज्ञान आणि धोरणे विकसित केली आहेत. हेच पाणी व्यवस्थापन आजही आपल्याला जास्त विचारशीलतेने आणि शाश्वततेने करणे आवश्यक आहे.

देशाला स्वातंत्र्य 1947 ला मिळाले देशासोबतच महाराष्ट्रही इंग्रजांच्या चौकटीतून मुक्त झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राजकीय नेत्यांसमोरील खऱ्या आव्हानांना सुरवात झाली. सर्वात महत्वाचे आव्हान म्हणजे इंग्रजांनी आणलेल्या भांडवलशाही कारभारातून देशाला शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाकडे घेऊन जाणे तसेच राज्यांना स्थैर्य मिळवून देणे. त्या दरम्यानच्या काळात देशातील अनेक राज्य भाषिक संघर्षातही होरफळली जात होती त्याची धग महाराष्ट्राला बसत होती. महाराष्ट्र सुद्धा स्वातंत्र्यापासून 1960 पर्यंत राज्य निर्मितीसाठी झटत होता. हे सर्व घडत असताना महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाण यांच्या सारख्या खंबीर नेत्याची साथ लाभली आणि महाराष्ट्राने विकासाची वाट पकडली. महाराष्ट्रातील जलव्यवस्थापन करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांचे मोलाचे योगदान राहिलेले आहे. त्यांच्या योगदानांचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.

**उद्दिष्टे**

1. महाराष्ट्र निर्मिती नंतर झालेल्या प्रमुख जलव्यवस्थापन प्रकल्पाची माहिती घेणे.
2. यशवंतराव चव्हाण यांच्या जलव्यवस्थापन क्षेत्रातील योगदान – महाराष्ट्राच्या जलविकासासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचा आणि धोरणांचा अभ्यास करणे.
3. प्रमुख जलप्रकल्पांचे सामाजिक आणि आर्थिक परिमाण – कोयना, उजनी आणि जायकवाडी यासारख्या प्रकल्पांनी शेतकरी, उद्योग आणि महाराष्ट्राच्या विकासावर कसा परिणाम केला आहे याचा अभ्यास करणे.
4. यशवंतराव चव्हाण यांच्या दृष्टीकोनातून जलव्यवस्थापनाचा भविष्य कालीन अभ्यास- त्यांची विचार धारा आणि आजच्या काळातील जल संवर्धनाचे महत्व समजून घेणे.

**यशवंतराव चव्हाण यांचा अल्पपरिचय -**

12 मार्च 1913 रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण देवराष्ट्रे येथे झाले व नंतर कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. पुढे उच्चशिक्षणासाठी ते कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात गेले. इ.स. 1938 साली इतिहास व राजकारण या विषयातून मुंबई विद्यापीठाची बी.ए. पदवी उत्तीर्ण होऊन पुण्यात त्यांनी लॉ महाविद्यालयात प्रवेश मिळवला. इ.स. 1941 साली एल.एल.बी. परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी वकिलीच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

व्यवसायास सुरवात केली. 2 जुन 1924 रोजी कराड येथील फलटणच्या मोरे कुटुंबातील कन्या वेणूताईशी त्यांचा विवाह झाला.(२)

यशवंतराव चव्हाण सर्व प्रथम सन 1946 मध्ये मुंबई राज्याच्या विधानसभेचे सदस्य म्हणुन निवडून आले. सन 1952 मध्ये पुरवठा आणि पंचायत मंत्री म्हणून त्यांची निवड झाली. सन 1956 साली द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी त्यांच्याकडे आली, पुढे महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाल्यावर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून सन 1960 साली त्यांनी जबाबदारी स्विकारली. 1962 साली केंद्र सरकारने केंद्रीय मंत्रीमंडळात समाविष्ट करून घेतले. 1946 ते 1962 हा 16 वर्षांचा काळ यशवंतरावांनी पूर्णपणे महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी समर्पित केला. पुरवठा मंत्री व त्यानंतर त्यांनी मुख्यंमत्री म्हणून महाराष्ट्राची धुरा सांभाळताना महाराष्ट्राला देशात एक प्रागतिक व संवेदनशील प्रगत राज्य म्हणून जो नावलौकीक मिळवून दिला तो त्यांच्या प्रगल्भ विचारसरणीचा दुरदृष्टीचा, मुत्सद्दीपणाचा परिचय करून देणारा ठरतो.

जलव्यवस्थापनाच्या बाबतीत यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या भविष्यातील आव्हानांचा विचार करून काही महत्वपूर्ण निर्णय घेतले. महाराष्ट्रात सर्वाधिक लोकसंख्या ही कृषी वर आधारित असल्याने त्यांनी जलसिंचन कसे वाढविले जाईल ही दूरदृष्टी ठेऊन वर्तमानकाळात कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील प्रमुख तीन प्रकल्पावर लक्ष केंद्रित केले आणि त्यांना पूर्णत्वासही नेले.

**जलव्यवस्थापन प्रकल्प उभारणीतील योगदान :-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी जलव्यवस्थापन नीती च्या अंतर्गत विविध प्रकल्प उभारून पूर्णत्वास नेले आहेत. त्यापैकी त्यांनी उभारलेल्या काही जलव्यवस्थापन प्रकल्प खालीलप्रमाणे आहेत.

**कोयना**

स्वातंत्र्यपूर्ण काळापासून कोयना हा प्रकल्प प्रस्तावित होता. पण प्रत्यक्ष कामाला मात्र सुरवात होत नव्हती. 1956 साली यशवंतरावांच्या पुढाकाराने त्यांच्या मुख्यमंत्री काळात या जलव्यवस्थापन प्रकल्पाची सुरवात झाली. या जलप्रकल्पाची उंची साधारणता 103 मीटर तर लांबी 807 मीटर असून जलाशयाचे क्षेत्रफळ 500 चौकिमी आहे. या जलाशयाची एकूण जलक्षमता 26677.6 दशलक्ष घनमीटर असून याची विजनिर्मिती क्षमता 1960 MW एवढी आहे. याद्वारे सातारा, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांना पिण्याचे आणि शेतीसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध होते.

“कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या संयंत्राचे उद्धाटन कळ दाबून मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते 15 मे 1962 रोजी झाले. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात ताबडतोब बीज खेळू लागली. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यावर या प्रकल्पाची सुरुवात झाली होती. (1956) आणि सात वर्षांत कोयना जलविद्युत प्रकल्पातून कोकणातील सारी खेडी विजेच्या लखलखाटाने प्रकाशमान झाली. 'कोयनेचा विद्युत प्रकाश महाराष्ट्रातले दारिद्र्य आणि अज्ञान दूर करील,' असे उद्गार पहिल्या विद्युत यंत्राचे उद्धाटन करताना यशवंतराव चव्हाण यांनी काढले होते. कोयना जलविद्युत प्रकल्पाचे हे काम म्हणजे गरिबाच्या घरचे लग्न आहे, अशी उपमा यशवंतराव चव्हाण यांनी दिली. गरिबाच्या घरी लग्नकार्यात केवढ्या अडचणी येतात, तेवढ्याच अडचणी या प्रकल्पासाठी आल्या, पण लग्नकार्य यशस्वी पार पडले, असेही यशवंतराव म्हणाले.”(3)


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**उजनी**

उजनी धरणाचे भूमिपूजन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते 1964 साली करण्यात आले. उजनी धरण भीमा नदीवर बांधले गेले आहे. उंची साधारणता 185 फुट, जलाशयाची एकूण संग्रहण क्षमता 3.3 किमी. आहे. वार्षिक वापर 2.410 किमी आहे. प्रकल्प सिंचन, जलविद्युत, पिण्याचे आणि औद्योगिक पाणीपुरवठा आणि मत्स्यपालनासंबंधी विकासाचे बहुउद्देशीय लाभ प्रदान करते. पाणी साठविण्याची क्षमता 1517 गिगालिटर्स आहे. क्षमतेच्या बाबतीतला या धरणाचा क्रमांक कोयना व जायकवाडी यांच्या ही आधी पहिला लागतो. साधारणता 12 MV एवढी वीजनिर्मिती उजनी प्रकल्पाद्वारे केली जाते.

यशवंतरावांच्या दूरदृष्टीमुळे हा प्रकल्प साकारला गेल्याने त्याच्या जलाशयास 'यशवंतसागर' असेही संबोधले जाते.(४)

**जायकवाडी**

मुख्यमंत्रीपदी यशवंतराव चव्हाण असतांना महाराष्ट्रातील जायकवाडी धरणाची योजना 1960 च्या दशकात आखली गेली. हे धरण मराठवाडा प्रदेशातील दुष्काळग्रस्त शेतीसाठी महत्त्वपूर्ण पाणीपुरवठा करते. तसेच, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांतील गावे व नगरपालिका यांना पिण्यासाठी आणि उद्योगांसाठी पाणी उपलब्ध करून देते. याशिवाय, हे धरण जलविद्युत निर्मितीस देखील मदत करते. तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात ही मोठ्या प्रमाणात जलसिंचन ह्या प्रकल्पातून होते. गोदावरी नदीवर वसलेले हे धरण छत्रपती संभाजी नगर जिल्यातील पैठण ह्या गावी आहे. ह्या धरणाला नाथसागर असे ही म्हटले जाते. छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी आणि नांदेड हे जिल्हे जायकवाडी धरणावर थेट अवलंबून आहेत. जायकवाडी धरणाची तब्बल 102 टीएमसी पाणीसाठ्याची क्षमता आहे. मराठवाड्यातील जवळजवळ 2.40 लाख हेक्टर क्षेत्र या धरणामुळे ओलिताखाली आलेले आहे. साधरणता 60 किमी लांबी तर 10 किमी रुंदी ह्या धरणाची असल्याचे म्हटले जाते.(५)

**निष्कर्ष**

यशवंतराव चव्हाण हे एक 'बहुआयामी व्यक्तिमत्त्व' असणारे नेतृत्व केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे ठरले. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासात त्यांचे योगदान निश्चित महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्राच्या त्यांनी पुढाकार घेतलेल्या जलव्यवस्थापनाच्या प्रकल्पांच्या विकासामुळे राज्याच्या कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडले आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे जलविकासाच्या क्षेत्रात अधिक समर्पित धोरणं राबवली गेली, त्यामुळे जलव्यवस्थापनाची दृष्टी आणि धोरण अधिक प्रभावी झाले. आजच्या काळात, जलसंपत्तीचे संवर्धन आणि वापर योग्य पद्धतीने करणे अत्यंत आवश्यक आहे, जे यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांशी सुसंगत आहे. जलव्यवस्थापनाच्या भविष्यकालीन दृष्टिकोनात, त्यांची विचारधारा, आजच्या जलसंकटाला सामोरे जाण्याच्या उपायांना मार्गदर्शक ठरेल.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**संदर्भ**

1. रामशरण शर्मा,***प्रारंभिक भारत का परिचय***, ओरीयंट ब्लेकस्वान नवी दिल्ली,2004,पृष्ठ क्र.74
2. डॉ. खैरनार अशोक,***महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हानांची भूमिका व कार्य***, अथर्व पब्लिकेशन,धुळे,2013, पृष्ठ क्र.45
3. भावे मधुकर,***यशवंतराव ते विलासराव***, मनोविकास प्रकाशन,पुणे,2008,पृष्ठ क्र.32
4. ए.बी.सवदी, ***भूगोल व कृषी***, निराली प्रकाशन,पुणे,2012, पृष्ठ क्र.10.1
5. प्रा.खतिब के.ए.,***महाराष्ट्राचा भूगोल***, के सागर पब्लिकेशन,पुणे,2004, पृष्ठ क्र.60


Copyright © | JET Network, All Rights Reserved